## ७८. <u>गाय , स्वातंज्य आणि माणूस (Cow, Freedom & Man)</u>

मित्रांनो , मला कल्पना आहे की हे शीर्षक वाचून तुम्ही परत एकदा नेहमीसारखेच चकीत झाले असाल. खरे तर हा विषय मला एका गाईमुळे सुचला व म्हणूनच मी गाईचा उल्लेख शीर्षकात केला.

आज नेहमीप्रमाणेच सकाळी फिरून येत असता अचानक एक तरूण गाय माझ्या बाजूने धावत पुढे गेली. अचानक थांबली , रस्ता ओलांडला , परत समोरच्या फुटपाथवरून पळू लागली. जोरजोरात हंबरत सुद्धा होती. बराच वेळ ती गाय पुढे मागे धावत होती , रस्ता ओलांडत होती. तशी वयाने तरूणच होती. अतिशय सुरेख व उमदे जनावर होते. गळयातील दावे दोन पायात येत होते. अर्थ सरळ होता की ती चुकून दाव्यासकट सुटली होती. सुटकेच्या आनंदाचा बहर लवकरच संपला होता व ती बावचळली होती.त्यामुळेच रस्त्यात सैरभैर अवस्थेत पळत होती. माझ्या मनात चटकन विचार आला कि दावे धरून तीला जवळच कोठेतरी गेटला बांधावी. परंतु का कोण जाणे मला ही जोखीम घेणे योग्य नाही असे वाटले व मी घरी परतलो. बघितलेल्या घटनांचा अर्थ एवढाच होता की मिळालेले स्वातंज्य त्या गाईला पचविता येत नव्हते व म्हणूनच ती गोंधळलेली होती.

ह्या घटनेनंतर माझ्या मनात विचार आला तो तरूण पिढीचा व त्यानंतर प्रत्येकाचा जो कोणत्यातरी गोष्टींपासून ,माणसांपासून , नियमांपासून सुटका अपेक्षित असतो. आपण जर का अशी कल्पना केली की प्रत्येकाला जर संपूर्ण स्वातंज्य दिले तर काय होई ल ? काय सुचतोय काही विचार ?

माझ्या मते ‘ अराजक ’ माजेल. समजा रस्त्यावर **( Signal )** सिग्नल नसते तर ?. वाहतूक एका जागेवरच थांबेल कारण प्रत्येकजणच वाहन पुढे दामटण्याचा प्रयत्न करेल व कोणालाच नीटपणे रस्त्यावरून वाहन चालवणे शक्य होणार नाही. अपघात होतील , भांडणे होतील , वेळेचा व इंधनाचा अपव्यय होईल.

तरूण पिढीला घरच्यांचा धाक नसेल तर विपरीत वर्तणुक घडण्याचीच शक्यता जास्त. समाजात दुफळी माजेल. बळी तो कान पिळी अशी अवस्था होईल. थोडक्यात म्हणजे जंगलचा कायदा , **Survival of the fittest** अशी परिस्थिती निर्माण होईल.

स्वातंज्य अनुभवायचे असेल तर नियमांची झालर हवीच. स्वातंज्य म्हणजे स्वैराचार नाही. नियमांमुळेच जरी स्वातंज्य कमी झाल्याची भावना झाली तरी स्वातंज्य उपभोगण्यासाठी त्याची आवश्यकता असते. आज भारतात जेवढे स्वातंज्य आपण उपभोगतो त्याची किंमत कळायची व समजून घ्यायची असेल तर जगाचा इतिहास वाचावा लागेल.

जेव्हा ‘ स्वातंज्य ’ हा शब्द आपल्या समोर येतो तेव्हा प्रथम आपल्याला परातंज्यातला देश आठवतो. पण मित्रांनो जरा खोलवर विचार करा कि ज्या देशात लोकशाही आहे त्या देशातील नागरिक खरेच स्वतंत्र आहेत का ? उत्तर अर्थातच नकारार्थीच असण्याची शक्यता जास्त. जोपर्यंत नागरीकाचे स्वातंज्य मग ते बोलण्याचे , दुस-या राज्यात जाण्याचे व राहण्याचे , कामधंदयाचे वगैरे जेव्हा लोकप्रतिनिधी किंवा सरकार यांच्यासाठी अडथळा होत नाही तो पर्यंतच ते स्वातंज्य अबाधित राहते. पेपरमधील किंवा टिव्ही वरील बातम्याच माझ्या ह्या विधानाची साक्ष देतील. कुटूंबातसुद्धा प्रत्येकाला अपेक्षित असलेले स्वातंज्य मिळते का ? आपली स्वातंज्यांची कल्पना बरोबर असेल तर कुटूंबप्रमुखाला हे पटवून द्यावे लागेल. समजा नाही पटले तर आपले स्वातंज्य आपल्या स्वबळावर मिळवावे लागेल. अर्थात स्वतःचे वेगळे घर करूनच. पण लक्षात असू द्या कि जेव्हा तुम्ही कुटूंबप्रमुख बनता तेव्हा इतरांनाही तुमच्या कल्पनेतील स्वातंज्य असेल का ? उत्तर परत एकदा नकारार्थीच असण्याची शक्यता. शेवटी आयुष्य काय , स्वातंज्य काय ? ही एक तडजोड आहे. शेवटी त्यागाशिवाय ह्या गोष्टींची चवच कळणार नाही.

वैयक्तिकपातळीवर बोलायचे तर प्रत्येकाला कोणते स्वातंत्र्य , कशाचे स्वातंत्र्य अपेक्षित आहे हे सांगता आले पाहिजे. त्याचबरोबर हे स्वातंत्र्य उपभोगायला आपण सक्षम आहेत का हे ही ठरविता आले पाहिजे.

आज आपली इंद्रिये बुद्धिच्या ताब्यात , बुद्धि मनाच्या ताब्यात व मन आत्मविवेकाच्या ताब्यात असणे गरजेचे असते. पण आपली बुद्धिच स्वतंत्र नसते. बुद्धिवर इंद्रियांची सत्ता चालते. मन बुद्धिकडे पारतंत्र्यात असते.

घरातील शिस्त थोडयाफार प्रमाणात इंद्रियांना बुद्धिच्या ताब्यात राहायला शिकवते. परंतु ही मिळालेली शिकवण आपल्याला मोठे झाल्यावर विसरायची नाहीये. ज्याला इंद्रिये ताब्यात ठेवता आली तो पारतंत्र्यातही स्वतंत्र राहू शकतो. म्हातारी माणसे आयुष्याच्या शेवटी मुलाबाळांच्या घरी एका अर्थाने पारतंत्र्यात असतात. पण त्यांच्या स्वातंत्र्यावर त्यांच्याच भल्यासाठी तरूण पिढीने बंधने लादलेली असतात. परंतु हे मुलांचे आपल्यासाठीचे ‘ श्रेयस्कर ’ वागणे वृद्ध मंडळींना कळणे आवश्यक आहे. ह्यावेळी जर ह्या मंडळींनी इंद्रिये ताब्यात ठेवण्याची सवय तरूणपणापासून लावली असेल तर त्यांना अशावेळी त्रास होणार नाही.

माझ्या मते स्वातंत्र्य व पारतंत्र्य एकामेकांना पुरक आहेत. स्वातंत्र्यात असलेला पारतंत्र्याचा नियमांच्या स्वरूपातील आसूडच स्वातंत्र्याची मजा मिळवून देऊ शकतो.

मित्रांनो बघा विचार करून आपल्या स्वातंत्र्याचा अगदी सर्वच अर्थांनी.